जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २७.०६.२०२६**

कोनगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. २८१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(५), ६१(२) सह महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ चे कलम ११(१), (२)(३), १२(१)(२) सह महाराष्ट्र विद्यापिठांच्या मंडळांचा व इतर विनर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम, १९८२ चे कलम ६, ८ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपीत यांना ताब्यात घेवून त्यांच्या कडून महाराष्ट्र शासनाव्दारे आयोजित शिक्षकांसाठी होणारी TET परीक्षेची प्रश्नपत्रिका प्राप्त केले बाबत.

-----ooo----

दिनांक २७/०६/२०२६ रोजी डॉ.पवन बनसोड, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-०२ भिवंडी यांना माहिती मिळाली की, काही इसम उदया दिनांक २८/०६/२०२६ रोजी होणा-या महाराष्ट्र राज्य शिक्षण पात्रता परिक्षा (TET) ची प्रश्नपत्रिका विकण्यासाठी येणार आहेत. त्या अनुषंगाने सदर माहितीची खातरजमा करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर, श्री. आशुतोष डुंबरे, मा. सह. पोलीस आयुक्त, ठाणे शहर डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर श्री. अशोक दुधे, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ भिवंडी डॉ. पवन बनसोड यांचे मार्गदर्शनाखाली विविध पथके तयार करुन त्या मार्फत TET च्या प्रश्नपत्रिका विक्रीस येणा-या ३ इसमांना ताब्यात घेतलेले आहे. सदर ताब्यात घेतलेल्या इसमांसोबत असलेल्या वस्तुंमध्ये उदया दिनांक २८/०६/२०२६ रोजी होणा-या शिक्षण पात्रता परिक्षेचे (TET) पेपर आढळून आले. शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांकडून खात्री केली असता सदर इसमांकडे सापडलेले पेपर हे उदया होणा-या परिक्षेकरिताचेच प्रश्नपत्रिका असल्याचे सांगितल्याने जागेवरच त्या लोकांना ताब्यात घेवून **कोनगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. २८१/२०२६** भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४)३१६(५) ६१(२), सह महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ चे कलम ११(१) (२)(३), १२(१)(२) सह महाराष्ट्र विद्यापिठांच्या मंडळांचा व इतर विनर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता वरिष्ठांच्या आदेशान्वये विशेष तपास पथकाची (SIT) स्थापन करण्यात आलेली आहे. SIT मध्ये डॉ.पवन बनसोड, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-०२ भिवंडी यांचे नेतृत्वात १) श्री.सचिन सांगळे,सपोआ पूर्व विभाग, भिवंडी, २) डॉ.विजय मराठे,सपोआ पश्चिम विभाग, भिवंडी व इतर ९ पोलीस निरीक्षक व सहा. पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी असे आहेत. सदरच्या प्रकरणात ३ आरोपी अटक केले असून ते १) वय ४५ वर्षे, रा. पटना राज्य बिहार, २) वय ३० वर्षे, रा.पटना राज्य बिहार,३) वय २८ वर्षे, रा पानीपत, राज्य हरीयाना याप्रमाणे आहेत. दाखल गुन्हयाचा सखोल तपास करण्यात येत असून तपासाचे अनुषंगाने विविध पथके तपासकामी रवाना केलेली आहेत. पुढील तपास चालू आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर